# दि व्यंकटेश्वरा सहकारी बँक लि.,

१०/१६७, तिरुपती बिल्डींग, मेन रोड, इचलकरंजी - ४१६११५.

## ❋ २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नोटीस ❋

**(फक्त सभासदांकरिता)**

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते कि, बँकेची **सन २०२३ -२०२४** या आर्थिक **वर्षाची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. ३१/०८/२०२४ इ. रोजी दुपारी ठीक ४.३० वाजता** महेश सेवा समिती, इचलकरंजी येथे खालील विषयांवर विचार करणेसाठी बोलविणेत आलेली आहे . तरी सभेस आपण वेळेवर उपस्थित रहावे हि नम्र विनंती .

## ❋ सभेपुढील विषय ❋

१. दि. १९/०८/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृतांत वाचून कायम करणे.

२. दि. ३१/०३/२०२४ अखेरचा वैधानिक लेखापरीक्षण यांचेकडून आलेला ताळेबंद, नफा-तोटा पत्रक स्वीकारणे व मंजूरी देणे.

३. सन २०२३-२०२४ सालच्या मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या निव्वळ नफा विभागणीस मंजुरी देणे.

४. सन २०२३-२०२४ या सालाचा वैधानिक लेखापरीक्षक यांचेकडून आलेला तपासणी अहवाल वाचून नोंद घेणे तसेच सन २०२२-२०२३ चा सहकार खात्याकडे पाठविलेला दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.

५. सन २०२३-२०२४ सालात अदांजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२४ -२०२५ सालाकरिता उत्पन्न व खर्चाचे अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

६. सन २०२४-२०२५ या वर्षासाठी मा संचालक मंडळाने कंकरंट लेखापरीक्षक यांची केलेली नेमणूक व त्यांचे मानधन याची नोंद घेऊन त्यास मंजुरी देणे.

७. सन २०२४-२०२५ सालाकरिता मा वैधानिक लेखापरीक्षक नियुक्ती बाबत रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचेकडून मंजूर होऊन येणाऱ्या नियुक्तीस मान्यता देणे .

८. बँकेच्या संचालक व नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

९. सन २०२३-२०२४ या सालात अनुत्पादित कर्जमधील व्याज सवलत देऊन बंद केलेल्या, निर्लेखित केलेल्या तसेच संशयित व बुडीत वर्गातील निर्लेखित करणेबाबत खात्यांची नोंद घेवून संचालक मंडळाच्या निर्णयास मंजुरी देणे.

१०. २९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे

११. मा. अध्यक्षसो यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर विचार करणे.

**ठिकाण : इचलकरंजी** **संचालक मंडळाच्या आदेशावरून ...**

**दिनांक : १२/०८/२०२४**

| | | |
|---|---|---|
| **श्री सुनिल सु. कोईक** | **श्री. इंदरचंद रा. लोया** | **श्री. श्रीकांत श्री. मंत्री** |
| **(मुख्य कार्यकारी अधिकारी)** | **(व्हा. चेअरमन)** | **(चेअरमन)** |

## -: सभासदांना नम्र सूचना :-

१. सदर सभा गणसंख्ये अभावी तहकूब झालेस ही सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरेल व त्यास गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

२. सन्मानीय सभासदांनी सभेपुढे लेखी सूचना व प्रश्न ठेवणेचे असतील त्यांनी बँकेच्या प्रधान कार्यालयात **दि. २०/०८/२०२४** पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहचतील अशा रीतीने पाठवावेत.

३. सन २०२३-२०२४ सालचा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रके बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करणेत आलेले आहेत .

४. आपल्या पत्यामधील बदल झाला असल्यास सभासदांनी आपला बदलेला पत्ता व मोबाईल नंबर प्रधान कार्यालयाकडे त्वरित कळवावा .

५. क्रियाशील सभासद होणेसाठी सभासदाची भाग धारणा (शेअर्स ) रक्कम रु १०००/- इतकी आवश्यक आहे. अपूर्ण भाग धारणा (शेअर्स ) रक्कम असणाऱ्या सभासदांनी त्वरित उर्वरित रक्कम भरून पूर्तता करावी.

६. बँकेकडील सर्व ग्राहक , खातेदार, व सभासदांनी आपला ग्राहक ओळखा (KYC) निकषांची पूर्तता करून खातेवर नियमित व्यवहार सुरु ठेवावेत, अन्यथा रिझर्व बकेच्या नियमाप्रमाणे १० वर्षे व्यवहार न झालेल्या खातेवरील शिल्लक रक्कम डिफ (DEA Fund) खातेस वर्ग करणेत येतील याची नोंद घ्यावी .